RNI No. MAHBIL /2012/47976
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र
असाधारण भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - ९, अंक - १९] गुरुवार, ऑक्टोबर २९, २०२० / कार्तिक ०७, शके १९४२ [पृष्ठे ३

असाधारण क्रमांक १९

प्राधिकृत प्रकाशन

जिल्हाधिकारी यांजकडून

वाचा : (१) मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा यांचेकडील पत्र क्रमांक सानप/सभा कामकाज/१८/२०२०, दिनांक २१ ऑक्टोबर २०२०.

(२) पीठासन अधिकारी तथा जिल्हा प्रशासन अधिकारी, सातारा यांचेकडील दिनांक २१ ऑक्टोबर २०२० रोजीच्या विशेष सभेचे इतिवृत्तांत.

(३) महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती (अध्यक्ष पदाची निवडणूक) (सुधारणा) नियम २००९, मुद्दा क्रमांक ७ (क).

(४) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम, १९६५ चे कलम ५१ (क) (४).

आदेश

क्रमांक साशा/नपा/(सातारा न. प. स्वीकृत सदस्य निवडणूक)/२४७५/२०२०.--ज्याअर्थी, सातारा जिल्ह्यातील सातारा नगरपरिषदेच्या स्वीकृत सदस्य पदांच्या निवडीबाबत दिनांक २१ ऑक्टोबर २०२० रोजी पार पडलेल्या विशेष सभेमध्ये स्वीकृत सदस्य पदावर निवड झालेल्या सदस्याचे नाव महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ५१ *(क) (४)* अन्वये राजपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम, १९६५ चे कलम ५१ *(क) (४)* नुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून मी, जिल्हाधिकारी, सातारा, नगरपरिषदेच्या स्वीकृत सदस्य पदावर निवड झालेल्या सदस्यांचे नाव खालीलप्रमाणे राजपत्रात प्रसिद्ध करीत आहे.

परिशिष्ट

अ. क्र.	नगरपरिषदेचे नाव	निवडून आलेल्या सदस्याचे नाव	निवड झालेल्या पदाचे नाव
१	२	३	४
१	सातारा नगरपरिषद, सातारा	श्री. सुनिल अशोक काळेकर	स्वीकृत सदस्य

शेखर सिंह,

जिल्हाधिकारी, सातारा.

सातारा, २७ ऑक्टोबर २०२०.

वाचा : (१) पीठासन अधिकारी, दहिवडी नगरपंचायत अध्यक्ष निवडणूक २०२० तथा उपविभागीय अधिकारी, माण-खटाव उपविभाग, दहिवडी यांचेकडील दिनांक ९ ऑक्टोबर २०२० चे इतिवृत्त.

(२) पीठासन अधिकारी, दहिवडी नगरपंचायत अध्यक्ष निवडणूक २०२० तथा उपविभागीय अधिकारी, माण-खटाव उपविभाग, दहिवडी यांचेकडील पत्र दहिनपं/कावि/१५७/२०२०, दिनांक २० ऑक्टोबर २०२०.

(३) महाराष्ट्र नगरपरिषदा व नगरपंचायती (अध्यक्ष पदाची निवडणूक) (सुधारणा) नियम २००९, चा नियम क्रमांक ७ *(क)*.

आदेश

क्रमांक साशा/नपा/(दहिवडी न. पं. अ. निवडणूक)/२४७६/२०२०.--ज्याअर्थी, सातारा जिल्ह्यातील दहिवडी नगरपंचायतीच्या अध्यक्ष पदाच्या निवडीबाबत दिनांक ९ ऑक्टोबर २०२० रोजी पार पडलेल्या विशेष सभेमध्ये अध्यक्ष पदावर निवड झालेल्या सदस्याचे नाव महाराष्ट्र नगरपरिषदा आणि नगरपंचायती (अध्यक्ष पदाची निवडणूक) (सुधारणा) नियम, २००९ चा नियम क्रमांक ७ *(क)* अन्वये राजपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा आणि नगरपंचायती (अध्यक्ष पदाची निवडणूक) (सुधारणा) नियम, २००९ चा नियम क्रमांक ७ *(क)* नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून मी, जिल्हाधिकारी, सातारा, दहिवडी नगरपंचायतीच्या अध्यक्ष यांचे नाव खालीलप्रमाणे राजपत्रात प्रसिद्ध करीत आहे.

परिशिष्ट

अ. क्र.	नगरपंचायतीचे नाव	निवडून आलेल्या सदस्याचे नाव	निवड झालेल्या पदाचे नाव
१	२	६	४
१	दहिवडी नगरपंचायत, दहिवडी	श्री. धनाजी नारायण जाधव	अध्यक्ष

शेखर सिंह,

जिल्हाधिकारी, सातारा.

सातारा, २७ ऑक्टोबर २०२०.

वाचा : (१) पीठासन अधिकारी, उपाध्यक्ष निवडणूक कोरेगाव नगरपंचायत तथा उपविभागीय अधिकारी, कोरेगाव उपविभाग, कोरेगाव यांचेकडील पत्र क्रमांक निवडणूक/कोरेगाव/न.पं./कावि/९७/१०७/२०२०, दिनांक २८ सप्टेंबर २०२० रोजीचे पत्र व विशेष सभेचे इतिवृत्त.

(३) महाराष्ट्र नगरपरिषदा १९६५, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम चे कलम ५१ *(क) (४)* व कलम ३४१ ब-२ (४).

आदेश

क्रमांक साशा/नपा/(कोरेगाव न. पं. उपा. निवडणूक)/२४७८/२०२०.--ज्याअर्थी, सातारा जिल्ह्यातील कोरेगाव नगरपंचायतीच्या उपाध्यक्ष पदाच्या निवडीबाबत दिनांक २८ सप्टेंबर २०२० रोजी पार पडलेल्या विशेष सभेमध्ये उपाध्यक्ष पदावर निवड झालेल्या सदस्याचे नाव महाराष्ट्र नगरपरिषदा, १९६५, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियमाचे कलम ५१ *(क) (४)* व कलम ३४१ ब-२ *(४)* अन्वये राजपत्रात प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, जिल्हाधिकारी, सातारा, कोरेगाव नगरपंचायतीच्या उपाध्यक्ष पदावर निवड झालेल्या सदस्याचे नाव महाराष्ट्र नगरपरिषदा, १९६५, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम चे कलम ५१ *(क) (४)* व कलम ३४१ ब-२ *(४)* अन्वये खालीलप्रमाणे राजपत्रात प्रसिद्ध करीत आहे.

परिशिष्ट

अ. क्र.	नगरपंचायतीचे नाव	निवडून आलेल्या सदस्याचे नाव	निवड झालेल्या पदाचे नाव
१	२	३	४
१	कोरेगाव नगरपंचायत, कोरेगाव	श्रीमती मंदा किशोर बर्गे	उपाध्यक्ष

शेखर सिंह,

जिल्हाधिकारी, सातारा.

सातारा, २७ ऑक्टोबर २०२०.

विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन यांजकडून

क्रमांक नपाप्र/न.पा.-१/कावि-५३१/२०२०/*शुद्धीपत्र*.--विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, पुणे यांजकडील अधिसूचना क्रमांक नपाप्र./ नपा-१/कावि-३७४/२०२०, दिनांक २८ जुलै २०२० अन्वये महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ पुणे विभागीय पुरवणी, असाधारण क्रमांक १४, दिनांक २८ जुलै २०२० रोजी पृष्ठ १ ते ३ वर प्रकाशित करण्यात आलेल्या चाकण नगरपरिषदेच्या निश्चित केलेल्या सदस्य संख्येनुसार सार्वत्रिक निवडणूक-२०२० घेणेबाबतच्या मराठी आदेशातील पृष्ठ क्रमांक १ वर परिच्छेद ३ मध्ये "राजगुरूनगर नगरपरिषदेची" या ऐवजी "चाकण नगरपरिषदेची" असे वाचावे.

आणि पृष्ठ क्रमांक २ वरील परिशिष्ट "अ" मधील स्तंभ क्रमांक २ मध्ये "नगरपंचायतचे" या ऐवजी "नगरपरिषदेचे" असे वाचावे.

सौरभ राव,
विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,
नगरपालिका प्रशासन, पुणे विभाग, पुणे.

पुणे, २९ ऑक्टोबर २०२०.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.